भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

# डी.पी. भोसले महाविद्यालयात शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटिबध्द : आ.डॉ. पतंगराव कदम

## विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांबरोबर गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने उपक्रम सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी




ग्रामस्थ व प्राध्यापक वर्ग यांच्याबरोबर संवाद साधताना आ.डॉ. पतंगराव कदम त्यावेळी डॉ. अनिल पाटील, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर व प्राचार्य डॉ. विजय सावंत.

कोरेगाव : कोरेगाव आणि कोरेगाव परिसरातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना पदवी व पदव्युत्तर स्तरावर अत्याधुनिक शैक्षणिक सर्व सुविधाबरोबर अन्य कोर्सेसही या महाविद्यालयात उपलब्ध करून देऊन डी.पी. भोसले महाविद्यालयात शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कटीबध्द आहे असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व स्थानिक व्यवस्थापन समितीची चेअरमन आमदार डॉ. पतंगराव कदम यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या डी.पी. भोसले महाविद्यालयात आयोजित केलेल्या महाविद्यालयाच्या शैक्षणिक व भौतिक सुविधासंदर्भात स्थानिक व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ व प्राध्यापकांच्या बैठकीमध्ये आ.डॉ.पतंगराव कदम अध्यक्षीय भाषणात बोलत होते. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन डॉ. अनिल पाटील प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, प्राचार्य डॉ. विजय सावंत उपस्थित होते. स्थानिक व्यवस्थापन समितीच्या बैठकीमध्ये विज्ञान पदवी स्तरावर वनस्पतीशास्त्र, भौतिकशास्त्र व प्राणीशास्त्र तसेच पदव्युत्तर स्तरावर मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, भूगोल व वाणिज्य इत्यादी विषय सुरू करण्याबरोबर प्रत्येक सेमिस्टरला प्रत्येक विद्यार्थ्याला तीन वर्षात सहा कोर्स पूर्ण करता येतील असे वीस ते पन्नास शॉर्ट टर्म कोर्सेस, भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, गुरूकुल प्रकल्प, आय.टी. संगणक शास्त्र व महाविद्यालयात सुसज्ज अशा सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आले. यावेळी आमदार डॉ. पतंगराव कदम यांच्या समवेत आयोजित केलेल्या ग्रामस्थांच्या बैठकीमध्ये ॲड. विजयराव कणसे, शहाजीराव बर्गे, माजी प्राचार्य अरूण बर्गे, उपसरपंच सौ.प्रतिभा बर्गे, शिवाजीराव महाडीक, सी.आर.बर्गे, डॉ. गणेश होळ, राजेश बर्गे, पृथ्वीराज बर्गे, आदी ग्रामस्थांनी महाविद्यालयात पदवी व पदव्युत्तर स्तरावर शैक्षणिक सुविधांबरोबर गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने अन्य उपक्रमही राबविण्यात यावेत.महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी गावकऱ्यांचे सहकार्य राहील अशी मनोगते व्यक्त केली.

यावेळी डॉ. अनिल पाटील आपल्या भाषणात म्हणाले की, रयत शिक्षण संस्थेची जी काही महाविद्यालये आहेत त्यातले हे खूप जुने महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाचा म्हणावा तसा विकास झाला नाही. परंतु नजिकच्या काळात हे महाविद्यालय संस्थेमधील एक आदर्श महाविद्यालय म्हणून ओळखले जाईल त्यासाठी सर्व सहकार्य राहील. नॅकच्या पुनर्मुल्यांकनावेळी सुचविलेल्या त्रुटींची पूर्तता करून प्राध्यापकांनी आपल्या अध्यापनाच्या कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात प्राचार्य डॉ. विजय सावंत यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी, युजीसीच्या योजना, प्रवेश प्रक्रिया, अनुदानित, विनाअनुदानित तुकड्या, महाविद्यालयाच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण होत असून या निमित्ताने महाविद्यालयात गुणवत्ता वाढीचे विविध उपक्रम, अनेक कोर्सेस, भौतिक सुविधा, पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर पदव्युत्तर वर्ग सुरू करणे. ११ वी व १२ वी क्रॅश कोर्स सुरू करणार असल्याचे सांगून उपस्थित मान्यवरांचे त्यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

प्राध्यापकांच्या बैठकीमध्ये रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर म्हणाले, उच्च शिक्षणाबाबत बहुजन समाजाच्या आपल्याकडून खूप अपेक्षा आहेत. विद्यार्थी हा केंद्र बिंदू मानून सेवकांनी आपल्या कर्तव्याशी प्रामाणिक राहून ज्ञानदानाचे काम करावे. आर.क्यु.एम.एस. आणि नॅकच्या संदर्भातील काम अद्यावत असावे. सचिवांनी केलेल्या सहकार्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले. स्थानिक व्यवस्थापन समितीच्या बैठकीस ज्ञानदेव भोसले माजी प्राचार्य एस.के. पाटील, विद्या प्रसारक मंडळाचे चेअरमन श्रीरंग भोसले, प्रा. दिलीप पवार, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रा. राबन मुल्ला, कार्यालयीन अधिक्षक, मारूतराव पवार तसेच ग्रामस्थांच्या समवेत आयोजित केलेल्या बैठकीमध्ये माजी जिल्हा परिषद सदस्य किरण बर्गे, माजी सभापती ज्योती भोज, उपसभापती अर्जून वीर, उदयसिंह बर्गे, हणमंतराव बर्गे, जितेंद्र भोसले, प्रा. सुरेश सकुंडे, अनिकेत भोसले, शिवलिंग बर्गे शिक्षणप्रेमी, हितचिंतक व ग्रामस्थ अधिक संख्येने उपस्थित होते.